सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक विभाग नाशिक
सामान्य प्रशासन विभाग

दुरध्वनी ०२५३-२४६२४०१ ई मेल - divcomnashik@gmail.com

---

क्रं. साशा-2/कावि/ 291 /2022
दि 01 /10/2022

प्रति,

मा. अपर मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**विषय : दि. 01 नोव्हेंबर 2022 या अर्हता दिनांकावर आधारित नाशिक पदवीधर मतदार संघाच्या मतदार यादया नव्याने तयार करणेबाबतचा कार्यक्रम. प्रसिध्दी रिपोर्ट सादर करणेबाबत.**

**संदर्भ :- भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र. 37/LC/2022-ERS(VOL-II)दि. 14 जुलै 2022**

भारत निवडणूक आयोग यांचेकडील दि. 14 जुलै 2022 रोजीच्या आदेशान्वये दि. 01/11/2022 या अर्हता दिनांकावर आधारीत नाशिक पदवीधर मतदार संघाची मतदार यादी नव्याने तयार करण्याचा कार्यक्रम घोषित केला आहे.

उपरोक्त कार्यक्रमाचे अनुषंगाने नाशिक विभाग पदवधीर मतदार संघ, मतदार नोंदणी सर्वसाधारण सूचना (अनुसूची - अ, प्रथम अनुसूची, द्वितीय अनुसूची, तिसरी अनुसूची) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक आणि विभागीय आयुक्त कार्यालयाचे संकेतस्थळावर, सर्व जिल्हयातील जिल्हाधिकारी कार्यालय आणि संकेतस्थळावर, उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसिलदार कार्यालय, पंचायत समिती कार्यालय इ. ठिकाणी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच सदरची सर्वसाधारण सूचना नाशिक विभागातील दोन वृत्तपत्रात दि. 01/10/2022 रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

**समवेत :- 1) सर्वसाधारण सूचना (अनुसूची - अ, प्रथम अनुसूची, द्वितीय अनुसूची, तिसरी अनुसूची) ची प्रत**

**2) जिल्हाधिकारी नाशिक, धुळे, जळगांव, नंदुरबार, अहमदनगर यांचे प्रसिध्दी अहवाल.**

3) दैनिक पुढारी व महाराष्ट्र टाईम्स कात्रण.

1/10/22

**(रमेश काळे)**
**उप आयुक्त, सामान्य प्रशासन,**
**नाशिक विभाग नाशिक**

Greater participation for a stronger democracy
जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी नाशिक यांचे कार्यालय
दूरध्वनी क्र. - .0253-2310523 ई.मेल - dydeonashik@gmail.com फॅक्स क्र..0253-2578652

क्र. निवडणूक/कावि/सं.क्र.1/ 392/2022
नाशिक, दिनांक - 01 /10/2022

प्रति,
मा. विभागीय आयुक्त तथा
मतदार नोंदणी अधिकारी,
पदवीधर मतदारसंघ, नाशिक
(सामान्य प्रशासन शाखा)

विषय :- दिनांक 01 नोव्हेंबर, 2022 या अर्हता दिनांकावर आधारीत पदवीधर मतदारसंघाच्या मतदार नोंदणी अनुसूची-1 प्रसिध्दी अहवाल सादर करणेबाबत...

संदर्भ :- आपलेकडील पत्र क्रं.साशा/-2/कावि/283/2022 दिनांक 23/09/2022

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सविनय सादर करण्यात येते की, जिल्ह्यात दिनांक 01नोव्हेंबर, 2022 या अर्हता दिनांकावर आधारीत पदवीधर मतदारसंघाच्या मतदार याद्या नव्याने तयार करणे कार्यक्रमांतर्गत मतदार नोंदणी नियम, 1960 च्या नियम 31(3) नुसार अधिसूचना (अनुसूची-अ, मराठी व इंग्रजी ) नाशिक विभाग पदवीधर मतदारसंघातील सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी यांचे कार्यालय/तहसिल कार्यालय/शैक्षणिक संस्था/महानगरपालिका कार्यालय (नाशिक/मालेगाव)/सर्व नगरपालिका नगरपंचायती/ मंडळ अधिकारी कार्यालय/ तलाठी कार्यालय/ divcomnashik.maharashtra.gov.in व nashik.gov.in या संकेत स्थळावर अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे व सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्ष यांना प्रत पुरविण्यात आली आहे.

करीता प्रसिध्दी अहवाल सोबत जोडून सादर केला आहे.

1/10/2022

( गंगाथरन डी. )
जिल्हाधिकारी तथा
सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी,
नाशिक विभाग पदवीधर मतदारसंघ, नाशिक

# प्रसिध्दी अहवाल

आज दिनांक 01/10/2022 रोजी मा. विभागीय आयुक्त, नाशिक तथा मतदार नोंदणी अधिकारी, नाशिक विभाग पदवीधर मतदारसंघ यांचेकडील पत्र क्रं.साशा-2/कावि/283/2022 दिनांक 23/09/2022 अन्वये, नाशिक पदवीधर मतदार संघाची मतदार नोंदणी अधिसूचना अनुसूची – अ यादीसह (मराठी व इंग्रजी ) नाशिक विभाग पदवीधर मतदारसंघातील सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी यांचे कार्यालय/तहसिल कार्यालय/शैक्षणिक संस्था/महानगरपालिका कार्यालय (नाशिक/मालेगाव)/सर्व नगरपालिका नगरपंचायती/ मंडळ अधिकारी कार्यालय/ तलाठी कार्यालय/ नोटीस बोर्डावर व divcomnashik.maharashtra.gov.in व nashik.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत आली आहे.

दिनांक :- 01/10/2022

( गंगाथरन डी. ) 1/10/2022

**जिल्हाधिकारी तथा**
**सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी,**
**नाशिक विभाग पदवीधर मतदारसंघ**

“सर्वसमावेशक, सुलभ आणि सहभागपुर्ण निवडणूका”

# जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय, जळगांव

फोन नं.-0257-2217640 Email-dydeojalgaon@gmail.com

जा.क्र./निवड-5/कावि/ 151 / 2022 दिनांक:- 01 /10/2022

प्रति,
मा. विभागीय आयुक्त,
नाशिक विभाग, नाशिक

विषय :- दि.01 नोव्हेंबर, 2022 या अर्हता दिनांकावर आधारीत पदवीधर मतदारसंघाच्या मतदार याद्या नव्याने तयार करणेबाबतचा कार्यक्रम... नाशिक पदवीधर मतदार संघाची अनुसूची - अ व प्रथम अनुसूची प्रसिध्दी बाबत..

संदर्भ :- 1.मा.भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचेकडील पत्र दि.14 जुलै 2022
2.मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग यांचेकडील पत्र दि.27.9.2022

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की, मा भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे निर्देशानुसार नाशिक विभाग, नाशिक पदवीधर मतदार संघाची निवडणूक 2022 संदर्भातील मतदार याद्या तयार करणेची अनुसूची-अ व प्रथम अनुसूची आज दिनाक 01.10.2022 रोजी जळगांव जिल्हयातील सर्व मंडळ अधिकारी कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, नगरपालिका कार्यालय, तहसिल कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जळगांव शहर महानगरपालिका तसेच जिल्हा परिषद, जळगांव येथे दिनांक 01.10.2022 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. माहितीस्तव सविनय सादर

( तुकाराम हुलवळे) 1.10.22
उपजिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव

**जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी यांचे कार्यालय, नंदुरबार**
**(निवडणुक शाखा)**

दुरध्वनी क्र.02564-210008 dydeonandurbar@gmail.com फॅक्स क्र.02564-210041

क्रमांक:/ग/कक्ष-8/निवडणुक/कावि/476/2022 दिनांक: 01/10/2022

**प्रति,**
मा.विभागीय आयुक्त तथा मतदार नोंदणी अधिकारी
नाशिक विभाग पदवीधर मतदार संघ नाशिक

विषय :-दिनांक:1 नोव्हेंबर,2022 या अर्हता दिनांकावर आधारीत पदवीधर मतदार संघाच्या मतदार यादयांचा पुनरिक्षण कार्यक्रम..
अनुसुची - अ प्रसिध्द करणेबाबत..
संदर्भ :-आपले कडील ई मेल संदेश दिनांक- 29/09/2022

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सविनय सादर करणेत येते की, मा.भारत निवडणुक आयोगाचे निर्देशानुसार दि.01.11.2022 या अर्हता दिनांकावर आधारीत पदवीधर मतदार संघाच्या मतदार यादयांचा पुनरिक्षण कार्यक्रम अंतर्गत, नंदुरबार जिल्हयातील, जिल्हा संकेतस्थळ, जिल्हाधिकारी कार्यालय/ तहसिल कार्यालय/ उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय / पंचायत समिती, सर्व शासकीय कार्यालय येथे आज दिनांक:01/10/2022 रोजी, मतदार नोंदणी नियम 1960 च्या नियम 31 (3) अन्वये, नोटीसीची अनुसुची – अ ( इंग्रजी व मराठी ) नोटीस बोर्डावर प्रसिध्दी आली आहे.कृपया स्विकृत होणेस विनंती .

1/10/2022
(संजय बागडे)
उप जिल्हाधिकारी तथा
उप जिल्हा निवडणुक अधिकारी, नंदुरबार

# जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर
## (निवडणूक शाखा)

दूरध्वनी क्रमांक-0241/2347623 e-mail-dydeoahmednagar@gmail.com


क्रमांक निवडणूक/कार्या12(2)/320 / 2022
अहमदनगर, दिनांक - 01/10/2022

प्रति,
मा. विभागीय आयुक्त,
नाशिक विभाग, नाशिक

विषय –नाशिक पदविधर मतदार संघाची मतदार यादी तयार करण्याच्या कार्यक्रमांची जाहीर सुचना अनुसूची "अ" मध्ये प्रसिध्दी केलेबाबत...
संदर्भ- आपणाकडील पत्र क्र. साशा- 2/कावि/285/2022 दि.27/09/2022

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयाबाबत सविनय सादर करण्यात येते की, नाशिक पदविधर मतदार संघाची मतदार यादी तयार करण्याच्या कार्यक्रमांची जाहीर सुचना अनुसूची "अ" मध्ये प्रसिध्दी करणेबाबत कळविण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने नाशिक पदविधर मतदार संघाची जाहीर सूचना अनुसूची "अ" मध्ये (मराठी व इंग्रजी) दिनांक 01/10/2022 रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर व संकेतस्थळावर तसेच सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, नगरपालीका कार्यालय व नगरपंचायत कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

माहितीस्तव सविनय सादर

आपला विश्वासू

(जितेंद्र पाटील)
उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी, अहमदनगर.

Scanned with CamScanner

# जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, धुळे यांचे कार्यालय
## (निवडणूक शाखा)

Email Id : dydeodhule@gmail.com
Phone : 02562- 288716

क्र.ग/कक्ष-11/निवडणूक/कावि/ 489 /2022 दि. 30 / 9 /2022

**नाशिक विभाग पदवीधर मतदारसंघ मतदार नोंदणी कार्यक्रम 2022**

प्रति,

मा. विभागीय आयुक्त,
नाशिक विभाग नाशिक
तथा मतदार नोंदणी अधिकारी,
नाशिक विभाग पदवीधर मतदारसंघ

**विषय** : नाशिक विभाग पदवीधर मतदारसंघ मतदार नोंदणी कार्यक्रम 2022
**अनुसूची – अ (मराठी व इंग्लिश) बाबत प्रसिध्दी अहवाल**

**संदर्भ** :- 1. भारत निवडणुक आयोगाकडील पत्र No. 37 / LC / 2022-ERS(Vol-II) दि. 14/07/2022
2. मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडून प्राप्त अनुसूची - अ

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, नाशिक विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतदार नोंदणीचा कार्यक्रम 2022 अंतर्गत अनुसूची – अ (मराठी व इंग्लिश) धुळे जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, धुळे , महानगरपालिका, धुळे तसेच जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, नगरपरिषद, नगरपंचायत व धुळे जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. याशिवाय धुळे जिल्ह्यातील मान्यताप्राप्त आणि 3 अमान्यताप्राप्त नोंदणीकृत राजकीय पक्षांना देण्यात आलेली आहे.

सदरचा प्रसिध्दी अहवाल आपल्या माहितीस्तव सविनय सादर.

आपला विश्वासू,

(अरविंद अंतुर्लीकर)
**उप जिल्हा निवडणुक अधिकारी, धुळे**